नि.दि.दा.क्र.१०१/२०१७
नि.क्र.४४

**मी सत्य प्रतिज्ञेवर शपथपूर्वक निवेदन करतो की,**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी**

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नाव | - | संतोष सखाराम मुक्तावार, |
| वय | - | ४२ वर्षे, |
| व्यवसाय | - | मुख्यालय सहायक, उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, जळकोट. |
| राहणार | - | जळकोट, जि. लातूर |

**वादीकरीता सरतपास विधीज्ञ श्री.ए.डी.पाटिल यांच्या वतीने**

१. मी निलंगा येथील भुमी अभिलेख कार्यालयात जुलै सन-२०१७ ते डिसेंबर -२०२१ या कालावधीत परिरक्षण भुमापक म्हणून कार्यरत होतो. मला प्रस्तूत प्रकरणात न्यायालय आयुक्त पत्र प्राप्त झाले होते. त्यानंतर कार्यालयाने मोजणी फिस भरून घेतली व मला कार्यालय प्रमुखांनी मोजणीसाठी नियुक्त केले. त्यानंतर मी वादी, प्रतिवादी व सर्व संबंधित भुधारकांना नोटिस बजावली. त्यानंतर ठरलेली तारिख दि.०९/१०/२०२१ रोजी मी मौजे दादगी येथील सर्वे क्र.३५ च्या जायमोक्यावर जाऊन ईटीएस मशिनच्या सहायाने मोजणी काम केली. मोजणी झाल्यानंतर मी जायमोक्यावर पंचनामा केला. त्यानंतर कार्यालयात येवून सर्वे क्रमांकचा अभिलेख पडताळून सर्वे क्रमांकचा अभिलेख बसविला. मी मोजणी नकाशा तयार केला. परंतू चालू ७/१२ प्रमाणे माझ्या निदर्शनास ३५/१, ३५/२, ३५/३, ३५/४ व ३५/५ असे पोटहिस्से नसल्याचे आले. त्याप्रमााणे मी नकाशावर टिप घेतलेली आहे. गट क्र.३५ मध्ये मला वादी यांच्या ताब्यात ९२ आर क्षेत्र असल्याचे निदर्शनास आले. ७/१२ प्रमाणे वादी यांच्या नावे १ हे. २८ आर क्षेत्र आहे. मी वस्तूस्थीतीप्रमाणे नकाशा तयार केला. त्यानंतर मी मोजणी नकाशाची 'क' प्रत व पंचनामा दाखल केला. आमच्या कडील अ प्रतीप्रमाणे दाखल क प्रत बरोबर आहे. दाखल मोजणी नकाशा

मला आता दाखविला, त्यावर आमच्या कार्यालयाची शिक्के आहेत, त्यावर माझी व माइया कार्यालय प्रमुखाच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. नकाशा **नि.क्र.४५** वर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**प्रतिवादी व त्यांचे विधीज्ञ गैरहजर. त्यांच्या वतीने अर्जही नाही. करिता उलट तपास नाही असा आदेश करण्यात येतो.**

**फेर तपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2025.06.21 16:46:19 +0530

(रवि वि. पांडे)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
निलंगा, जि.लातूर

दि.२१/०६/२०२५